सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१ E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा:- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ३०, ३३, ३४, ४१ व कलम ५१.
२) साथरोग नियंत्रण कायदा १८९७.
३) भारत सरकार गृह मंत्रालय यांचेकडील पत्र क्रमांक १३७/२०१८/FTS १०५४८ दिनांक ४/२/२०२०
४) या कार्यालयाकडील आदेश क्रमांक जि.आ.व्य./कोरोना विषाणु/१८०/२०२० दिनांक २५/३/२०२०

जिल्हाधिकारी पुणे

क्र.जि.आ.व्य/कावि/१८१५/२०२०.
पुणे दिनांक २५/०६/२०२०.

**आदेश**

**ज्याअर्थी,** शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ हा दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकरी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**ज्याअर्थी,** आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणु संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहे. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणुचे संसार्गात अधिक वाढ होवु न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. त्याधर्तीवर राज्यात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा आदेश पारित करणेत आलेला आहे.

**ज्याअर्थी,** शासन निर्णयानुसार औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन प्रक्रिया चालु करणेच्या अनुषंगाने पुणे जिल्हयात शहरी व ग्रामीण भागामध्ये औद्योगिक कारखाने / कंपन्या चालु करणेत आलेल्या आहेत. जिल्हयातील मोठया कंपन्यांमधील बराचसा अधिकारी / कर्मचारी / कामगार वर्ग हा पुण्याच्या लगतच्या जिल्हयातुन पुणे जिल्हयामध्ये दैनंदिन ये जा करीत असुन त्यांना कंपन्यांमध्ये येण्यास व परत त्यांचे राहते ठिकाणी जाणेसाठी परवानगी मिळणेबाबतची विनंती अर्ज कंपनी आस्थापनाकडुन या कार्यालयाकडे प्राप्त होत आहे. कोरोना विषाणुच्या प्रतिबंधात्मक उपापयोजनेचे अंमलबजावणीसाठी Incident Commander म्हणुन संबंधित उपविभागाचे उपविभागीय अधिकारी यांना वाचा क्रमांक ४ अन्वये अलहिदा अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्यअर्थी **मी नवल किशोर राम अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी पुणे** जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागातील कंपन्यांमध्ये पुण्याच्या लगतच्या जिल्हयातुन पुणे जिल्हयामध्ये येणा-या कर्मचारी / कामगार वर्गास खालील अटी शर्तीच्या अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) संबंधित कंपनी आस्थापनेने सोबत जोडलेले विहीत नमुन्यातील Self Declaration करणे आवश्यक आहे.

२) पुणे जिल्हयातील कंपन्यांमध्ये दैनंदिन कामकाजासाठी येणारा कर्मचारी कंटेनमेंट झोनमधुन येत नसलेबाबत Self Declaration मध्ये संबंधित कंपनीच्या आस्थापनेने नमुद करणे बंधनकारक आहे. तसेच इतर जिल्हयातुन येणारे अधिकारी / कर्मचारी / कामगार यापैकी कोणीही कंटेन्मेंट झोन मधील नाही याबाबतची सर्व जबाबदारी Self Declaration करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी / कामगार यांची असेल.

Scanned by CamScanner

३) दैनंदिन प्रवासाकरीता संबधित कंपनीने फक्त अधिकारी / कर्मचारी / कामगारांच्या वाहतुकीसाठी राखीव अशी बसची सोय करणे बंधनकारक राहील.

४) संबंधित अधिकारी / कर्मचारी / कामगार यांना त्यांचे राहते घरापासुन ते कंपनीपर्यंतचाच प्रवास मान्य राहील. या व्यतिरिक्त त्यांना कोणताही प्रवास अनुज्ञेय नाही.

५) प्रवासात संबंधित अधिकारी / कर्मचारी / कामगार यांनी कंपनीचे अधिकृत ओळखपत्र जवळ ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रवासात संबधित अधिकारी / कर्मचारी / कामगार यांची निवास ठिकाणाचा पत्ता तपासणीसाठी स्वत:कडे आधारकार्ड / पॅनकार्ड व इतर तत्सम कागदपत्रे ठेवणे बंधनकारक आहे.

७) दैनंदिन प्रवास करणाऱ्या सर्व कामगारांचे दररोज थर्मलगन व्दारे तापमान मोजणे, मास्क परिधान करणे, सोशल डिस्टंन्सींग पाळणे, कर्तव्याच्या ठिकाणी सॅनिटायझरचा वापर करणे इ. गोष्टी बंधनकारक राहतील.

८) संबंधित अधिकारी / कर्मचारी / कामगार यांची वाहतुक करणा-या बसच्या दर्शनी भागावर कंपनीने केलेले Self Declaration व Declaration सोबत Annexure - १ मध्ये वाहनात प्रवास करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी / कामगार यांची यादी बसच्या दर्शनीभागामध्ये लावणे बंधनकारक राहील.

९) जिल्हा हद्दीच्या ठिकाणी चेक पोस्टवरील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी कंपनीच्या बसच्या दर्शनी भागावर लावलेल्या Self Declaration व Declaration सोबत Annexure -१ ची खात्री करावी व त्याप्रमाणेच वाहनामध्ये अधिकारी / कर्मचारी / कामगार आहेत का ? व सर्वांकडे कंपनीचे अधिकृत ओळखपत्र व स्वत:चे आधारकार्ड / पॅनकार्ड व इतर तत्सम कागदपत्रे आहेत का ? याबाबतची खात्री करावी.

१०) शासनाकडील क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/ डीआयएसएम-१ दिनांक १७ एप्रिल २०२० रोजीच्या मार्गदर्शक सुचना मधील परिशिष्ट १ व २ प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

११) संबंधित कंपनीने Self Declaration व Declaration सोबत Annexure -१ यासोबत अधिकारी / कर्मचारी / कामगारांच्या वाहतुकीची माहिती एक दिवस अगोदर Incident Commander यांना मेल व्दारे किंवा हस्तपोहोचव्दारे देणे बंधनकारक राहील हीच माहिती वैध व कायदेशीर समजली जाईल.

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

**प्रति:- उपविभागीय अधिकारी सर्व यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

**प्रत:- १) पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.**

**२) व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**

**३) President Manufacture Association of Pune यांना माहितीसाठी**

Scanned by CamScanner